Exh. No. 1/B

// १ //

दैनिक रजिष्टर नं.          /२०२६.

किरकोळ दिवाणी अर्ज नं. 74          /२०२६.

# मे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर

यांचे न्यायालयात ...

| | |
|---|---|
| सौ. सृष्टी प्रशांत डोईफोडे,<br>वय — ३१ वर्षे, धंदा — नोकरी,<br>रा. द्वारा पंडीतराव रामु गवळी,<br>रेखा चौगुले नगर, गारगोटी,<br>ता. भुदरगड, जि. कोल्हापूर.<br>मोबाईल नं.९५११२३६३१५. | ... अर्जदार. |

// विरूध्द //

| | |
|---|---|
| श्री. प्रशांत प्रकाश डोईफोडे,<br>वय — ३५ वर्षे, धंदा — नोकरी,<br>रा. [illegible] नगर, स्वामी अपार्टमेंटच्या मागे,<br>इ[illegible], ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.<br>मोबाईल नं.[illegible]७५५२५९५२. | ... वि.प. |

KAVITA BIPIN AGRAWAL

Digitally signed by KAVITA BIPIN AGRAWAL
Date: 2026.04.06 16:04:11 +0530

Order
Issue notice to Opponent

PDJ, Kolhapur
06/04/2026

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

दिवाणी प्रक्रिया संहिता कलम २४ प्रमाणे मे.दिवाणी न्यायाधीशसो वरिष्ठ स्तर, इचलकरंजी (मा. पी.पी.एन.रोकडेसो) यांचे कोर्टातील एच.एम.पी. नं.३६०/२०२५ हे मे. दिवाणी न्यायाधीशसो

(मा. वामन सो.)
वरिष्ठ स्तर, कोल्हापूर यांचे कोर्टात वर्ग होणेबाबतचा अर्ज.

यातील अर्जदार यांचे मे. कोर्टाना नम्र कळविणे खालीलप्रमाणे,

१) यातील अर्जदार व वि.प. यांचा विवाह तारीख ०९.०३.२०२१ रोजी एकमेकांचे व त्यांचे कुटूंबियांचे पसंती व संमतीने हिंदू धर्म व रूढी परंपरा रितीरिवाजाप्रमाणे अशोका हॉल, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथे संपन्न झालेला आहे. सदर विवाहसंबंधातून अर्जदार यांना वि.प.पासून दि.२३/०३/२०२२ रोजी चि. स्पंदन हा मुलगा झालेला आहे.

२) अर्जदार व वि.प. यांचे लग्न ठरतेवेळी साखरपुडा व लग्न याचा एकूण खर्च रूपये तीन लाख हा अर्जदाराच्या आईवडिलांनीच केला. तसेच लग्नात अर्जदाराच्या आईवडिलांनी वि.प. यास सोन्याची दीड तोळ्याची चेन, अर्धा तोळ्याची अंगठी, तसेच पाठपरतवणीच्या वेळी अर्धा तोळ्याची अंगठी व पहिल्या दिपावळीत अर्धा तोळ्याची अंगठी इ. दागिने घातले आहेत आणि अर्जदाराच्या आईवडिलांनी अर्जदारास १ तोळा सोन्याची ठुशी, साडेपाच तोळ्याच्या सोन्याच्या बांगड्या व ३ तोळे सोन्याचा गोठ इ. दागिने घातले आहेत.

३) तसेच अर्जदारकडून लग्नात वि.प.ला एक लाकडी

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

बेड, एक लोखंडी तिजोरी, एक ड्रेसींग टेबल, स्टीलची भांडी, कुकर, मिक्सर, इंडक्शन व इंडक्शनची भांडी, ताट, वाट्या तसेच धारेची भांडी २ सेटमध्ये, १ गणेशाची चांदीची मुर्ती असे संसार साहित्य सुध्दा दिलेले आहे. वि.प.कडून अर्जदाराला दीड तोळ्याचा सोन्याचा नेकलेस, तीन ग्रॅम सोन्याची अंगठी, कानातील टॉप्स अंदाजे ३ ते ४ ग्रॅम आणि मोठे सोन्याचे गंठण अंदाजे तीन तोळे आणि दोघांचेत मिळून मनीमंगळसूत्र असे दागिने घातलेले आहेत.

४) तसेच वि.प.ने अर्जदाराला पहिल्या पाडव्याला अर्धा तोळ्याची सोन्याची अंगठी व अर्धा तोळा सोन्याचा कानातील वेल आणि नागपंचमीच्या सणाला वंशामध्ये २ ते ३ ग्रॅमची सोन्याची नथ असे दागिने घातलेले आहेत.

५) अर्जदारांनी व वि.प. यांनी घातलेले वर नमूद सर्व दागिने व संसारसेट हे वि.प.ने भांडण काढून स्वत:कडेच ठेवलेले आहेत.

६) लग्न ठरताना वि.प. व त्यांचे आईवडील व नातेवाईक यांनी अर्जदार, तिचे आईवडील व नातेवाईक यांना मुलगा हा जस्ट डायल पनवेल या कंपनीत नोकरीस आहे आणि त्याला दरमहा २५ ते ३० हजार पगार आहे व त्याला कोणतेही दारू, सिगरेट, तंबाखू इ. व्यसन नाही, अशी स्पष्ट माहिती दिली होती.

Superintendent(Lit.)
District Court Kolhapur

७) लग्नानंतर अर्जदार वि.प. कडे नांदणेस गेली असता वि.प. ने कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय अर्जदार यांचेसोबत पाठराखीण म्हणून आलेली तिची बहीण हिला त्वरीत घालवून अर्जदारसोबत विधी पुर्ण होण्याअगोदरच शारिरीक जवळीक साधली. त्यामुळे अर्जदारने वि.प. कडे नाराजी व्यक्त केली व सर्व विधी पुर्ण होवू देत म्हणून समजावले परंतू वि.प.ने अर्जदाराचे ऐकले नाही. सदर बाबत अर्जदारने तिच्या माहेरी कळविले.

८) यानंतर वि.प. व अर्जदार हे लग्नाचे ८ ते १० दिवसांनंतर ते गोवा येथे फिरायला गेले असता पहिल्याच रात्री वि.प. हा मद्यधुंद अवस्थेत धुम्रपान करू लागला आणि अर्जदाराला म्हणाला की, *"तुझ्या आईवडिलांनी लग्नात म्हणावा तसा आमच्या कुटूंबियांचा मानपान केला नाही, लग्नात भंगार हॉल ठरवला, लग्नात डोली घोडा नव्हता, रूखवतामध्ये म्हणावे तसे साहित्य ठेवले नाही".* यावेळी वि.प.ने अर्जदाराशी दारूच्या अंमलाखाली भांडण काढले आणि तो एकटाच अर्जदाराला रूममध्ये ठेवून लॉनवर जावून घरच्यांशी मोठमोठ्याने ओरडून बोलू लागला. हे पाहून अर्जदारांना आश्चर्याचा धक्का बसला आणि ती घाबरून गेली. कारण याबाबत लग्न ठरणेपुर्वीच वि.प.ला कोणतेही व्यसन नाही, असे त्यांनी सांगितले होते. यामुळे अर्जदार हिचा विश्वासघात झाला.

९) यानंतर पुन्हा अर्जदार या वि.प.कडे नांदण्यास गेल्या

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

असता त्यांना वि.प., त्यांची आई ही सतत *"तुला जेवण करता येत नाही, आईवडिलांनी तुझ्यावर काही संस्कार केले नाहीत, लग्नात काही हुंडा दिला नाही"* असे अर्जदारास टोमणे मारू लागली. सुरवातीला अर्जदार हिने त्याकडे दुर्लक्ष केले परंतू त्याचा गैरफायदा घेवून वि.प. व त्याची आई अर्जदारास जास्तच त्रास देवू लागले.

१०) अर्जदार ही नांदत असताना वि.प. याला नोकरी सुध्दा नाही, हे दिसून आले म्हणून अर्जदाराने याबाबत वि.प. व त्यांच्या आईकडे विचारणा केली असता *"तुला आमच्या घरी नांदायचे असेल तर स्वतःलाच जॉब करावा लागेल आणि घरची धुणी—भांडी सुध्दा तुलाच करावी लागतील"*, अशी बतावणी केली. यामुळे अर्जदाराला खूप मानसिक धक्का बसला. याबाबत अर्जदार हिने तिच्या आईवडिलांना कळविले असता सुरवातीला अर्जदारच्या आईवडिलांनी नुकतेच लग्न झालेले आहे, तेंव्हा हळुहळू सर्व ठीक होईल, अशी सांगून अर्जदाराची समजूत काढली.

११) मे—२०२१ मध्ये वि.प. ची बहीण कोरोनाग्रस्त झालेने तिला अर्जदाराचे सासरी आणले व वि.प.ने अर्जदाराला तिचे माहेरी पाठवत असताना वाटेत वि.प.ने, *"आपण लग्नबंधनातून मोकळे होवूया"* असा विषय काढला. हे ऐकून अर्जदाराला जबर मानसिक धक्का बसला. तरीही अर्जदार व तिच्या आईवडिलांनी नमतेपणा घेवून अर्जदाराला नांदणेस पाठविले.

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

१२) नोव्हेंबर २०२१ मध्ये अर्जदाराचा भाऊ भाऊबीजेच्या सणासाठी अर्जदारास माहेरी आणणेस गेला असता त्याचा वि.प. व त्याच्या आईने जेवणाच्या ताटावर अपमान केला व भांडण काढले. हे सुध्दा अर्जदाराने निमूटपणे सहन केले. इतकेच नव्हे तर, लग्नानंतर पहिल्या दिपावली सणाला अर्जदार व तिच्या आईवडिलांनी योग्य तो मानपान करून अर्धा तोळ्याची एक सोन्याची अंगठी घातली व अर्जदारास पुन्हा वि.प.कडे नांदणेस पाठविले.

१३) दरम्यानच्या काळात अर्जदार ही वि.प.कडे नांदत असताना तिला असेही समजले की, वि.प. चे वडील हे जुगार खेळतात आणि परपुरूषांच्या उपस्थितीत सासरे अर्जदारला चहापाणी करून आणणेबाबत बोलू लागले. त्यामुळे अर्जदाराला खूप अपमानास्पद वाटले. तरीही अर्जदाराने त्याकडे दुर्लक्ष केले.

१४) आज ना उद्या आपला संसार सुखाचा होईल या आशेने अर्जदार वि.प.सोबत नांदू लागली. यादरम्यान अर्जदाराला वि.प. पासून दिवस गेले. यानंतर गर्भ तीन ते साडेतीन महिन्यांचा झाला असताना वि.प., त्यांचे आईवडील, नणंद या सर्वांनी अर्जदाराला, *''आम्हांला मुलगाच हवा आहे, तेंव्हा आपण गर्भतपासणी करू''* असा तगादा लावला. त्यास अर्जदार व त्यांचे आईवडील, नातेवाईक यांनी नकार दिला. त्यामुळे वि.प. व त्यांचे आईवडिलांनी अर्जदारास

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

जास्तच त्रास देणेस सुरवात केली.

१५) त्यानंतर ७ व्या महिन्यात अर्जदाराचा डोहाळे जेवणाचा कार्यक्रम ठरला. सदर कार्यक्रमावेळी देखील वि.प. व त्यांचे आईवडिलांनी याबाबत मोठे भांडण काढून अर्जदाराला टोमणे मारले व वि.प. च्या वडिलांनी अर्जदाराच्या आईला अर्जदाराची ओटी भरू दिली नाही व ते अर्जदाराला, ''*मुलगी शेण खाते का*'' असे बोलून अर्जदार हिच्या तिचे आईवडील व नातेवाईकांसमक्ष अपमान केला. त्यानंतर अर्जदार ही माहेरी आली.

१६) माहेरी आल्यानंतर अर्जदार हिला तारीख २३/०३/२०२२ रोजी मुलगा झाला. ही गोष्ट अर्जदारच्या आईवडिलांनी वि.प. व घरचे लोकांना सांगितली असता वि.प.ने कोणताही आनंद व्यक्त केला नाही.दिनांक ०२/०४/२०२२ रोजी मुलगा स्पंदन याचे पाडव्याच्या शुभमुहूर्तावर अर्जदार व तिच्या आईवडिलांनी बारसे केले पण तिथेही वि.प. व त्याच्या घरचे लोकांनी वाद करून बारसे हॉलवर केले नाही म्हणून दंगा केला आणि ३ महिने झाले तरी अर्जदाराला व बाळाला सासरे बोलावले नाही व ''*तू माहेरीच रहा आणि मी सांगितलेखेरीज सासरी येवू नको, माझे आईला लहान बाळाचे व तुझे करणे जमणार नाही*'' असे वि.प. अर्जदाराला बोलला. त्यामुळे अर्जदाराचे मानसिक खच्चीकरण होवून तिला खूप वाईट वाटले.

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

१७) त्यानंतर सप्टेंबर २०२२ मध्ये अर्जदाराचे वडील वि.प. चे घरी गेले व वडिलांनी वि.प.ला अर्जदार हीस गौरी गणपतीच्या सणाकरिता पाठवून देणेबाबत विचारणा केली असता वि.प.ने वाद करून *"मुलीस तुम्ही कायमचीच घेवून जावा, तिचे चालचलन व्यवस्थित नाही, तिचे माझे काही पटणार नाही"* असे बोलला. त्यामुळे अर्जदाराचे वडील व भाऊ नाईलाजास्तव अर्जदारास घरी घेवून आले.

१८) यानंतर अर्जदार व त्यांच्या नातेवाईकांनी वि.प. व त्यांचे आईवडिलांशी बऱ्याचवेळेला तसेच डिसेंबर, २०२२ ते जानेवारी, २०२३ या दरम्यान मध्यस्थ श्री. संभाजी डोईफोडे, रा.किणी व सौ. सुरेखा डोईफोडे, रा. पाचगांव यांचेमार्फत समझोता करणेचा प्रयत्न केला असता वि.प. व त्याच्या आईवडिलांनी त्यास नकार दिला.

१९) जेंव्हा चि. स्पंदन हा सव्वा वर्षांचा झाला त्यावेळी अर्जदार व त्यांच्या आईवडिलांनी मुलाच्या जावळासाठी वि.प. व त्याच्या आईवडिलांना आमंत्रण दिले असता कोणीही आले नाही.

२०) यानंतर अर्जदार, तिचे आईवडील व नातेवाईक स्वत:हून बाळाला घेवून अर्जदाराचे सासरी इचलकरंजी येथे गेले असता

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

*''आमचा मानपान होत नाही, अशी सूनच नको''* असे वि.प.च्या आईने सांगितले व सर्वांसमोर अर्जदार, तिचे आईवडील आणि नातेवाईकांचा अपमान केला. त्यावेळी मोठी भांडणे करून वि.प. व त्याचे आईवडिलांनी अर्जदार हिला तिच्या आईवडिलांनी घातलेले आणि वि.प.कडून आलेले सर्व दागिने काढून घेतले व अर्जदारास घरातून बाहेर काढले. त्यामुळे नाईलाजास्तव अर्जदार व तिचे आईवडील, नातेवाईक अर्जदाराला गारगोटी येथे दिनांक २१/०५/२०२३ रोजी माहेरी घेवून आले व तेंव्हापासून कायमपणे अर्जदार ही बाळासह तिचे माहेरी राहत आहे.

२१) आपली बदनामी होवू नये व अजुनही संसार सुखाचा होईल, या आशेने अर्जदार व तिच्या आईवडिलांनी पोलीस स्टेशनला वगैरे कोठेही तक्रार केली नाही.

२२) यानंतर बऱ्याचवेळेला अर्जदार व तिच्या आईवडिलांनी वि.प. आणि तिच्या आईवडील, नातेवाईक यांचेशी मुलीला नांदणेसाठी घेवून जाणेबाबत प्रयत्न केला परंतू त्यास वि.प.ने नकार दिला व *''मी मुलाला आणि अर्जदाराला नांदवणार नाही''*, अशी बतावणी केली. यानंतर अर्जदारने बाळाच्या व स्वतःच्या भविष्यासाठी विविध स्पर्धा परीक्षांची तयार केली. त्यावेळी सुध्दा वि.प. व त्यांच्या आईवडिलांनी बाळाची आणि अर्जदाराची काही चौकशी केली नाही.

Superintendent(Lit.)
District Court, Kolhapur

२३) यानंतर अर्जदार हिने स्वत: परिश्रम करून सरळसेवेमार्फत सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोकरी मिळविली. त्यावेळी अर्जदाराने फोनद्वारे वि.प.कडे कागदपत्रांची व कपड्यांची मागणी केली परंतू वि.प.ने *"तू कोर्टातून ये, मी तुला नांदवणार नाही"* असे म्हणाला.

२४) यानंतर सतत रात्री अपरात्री वि.प. हा दारूच्या नशेत अर्जदाराला तिच्या फोन नंबर ९५११२३६३१५ यावर घाणेरडे व अपमानास्पद मेसेज करणे आणि तिच्या चारित्र्यावर नाहक संशय घेणे व आईवडिलांना शिवीगाळ करणे, असे कृत्य करू लागला. याबाबतचा सर्व तो पुरावा अर्जदारांनी जतन करून ठेवलेला आहे.

२५) वि.प. व त्याच्या आईवडिलांची आर्थिक स्थिती अत्यंत श्रीमंतीची आहे. त्यांचे स्वत:चे आर.सी.सी. २ मजली घर आहे. वि.प. ची आई ही प्राथमिक शिक्षीका म्हणून सरकारी नोकरीत आहे आणि तिला अंदाजे १ लाखापेक्षा जास्त दरमहा वेतन आहे. तसेच वि.प. यांचे वडील हे मे—२०२४ ला माध्यमिक शिक्षक म्हणून गोविंदराव हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, इचलकरंजी येथून सेवानिवृत्त झालेले आहेत व त्यांना दरमहा अंदाजे ४० ते ५० हजार रूपये पेन्शन आहे व बराचसा फंड आणि तद्नुषंगिक इतर रकमा मिळालेल्या आहेत. वि.प. यांचेवर आईवडिलांची कोणतीही जबाबदारी नाही. वि.प. यांना स्थावर व जंगम मिळकतीतून दरमहा ४

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

ते ५ लाख रूपये उत्पन्न मिळते. अर्जदार हिचा मुलगा स्पंदन हा सध्या ३ वर्षांचा असून त्याला आता शिक्षणासाठी शैक्षणिक व इतर खर्च लागणार आहे. अर्जदार व तिच्या मुलाची सर्व पालनपोषण, औषधोपचार, शिक्षण इ. सर्व जबाबदारी ही नैतिक व कायदेशीरदृष्ट्या वि.प.चीच आहे. परंतू आजतागायत वि.प.ने त्याकडे दुर्लक्ष करून अर्जदारांची काहीही आर्थिक व्यवस्था केलेली नाही. अर्जदार ही नुकतीच जरी नोकरीस लागली असली तरी सुध्दा मुलाच्या व तिच्या भवितव्याचा विचार करता अर्जदारास योग्य पालनपोषणाकरिता योग्य ती पोटगी मिळणे गरजेचे आहे.

२६) अशाप्रकारे वि.प. व त्याच्या आईवडिलांनी अर्जदार हिच्या चारित्र्यावर नाहक संशय घेवून तिला सुरवातीपासून योग्य तो मानपान झाला नाही, तसेच मुलाला कोणतेही व्यसन नाही, असे खोटे सांगून अर्जदाराचा विश्वासघात केला आहे आणि दारूच्या अंमलाखाली सतत वि.प.शी भांडण काढून तिला शारिरीक व मानसिक त्रास दिलेला आहे व वारंवार, ''*आपण वेगळे होवू, तू कोर्टातून ये, मला तुझेशी नांदायचे नाही*'', अशाप्रकारे मानसिक क्रुरतेची वागणूक दिलेली आहे. त्यामुळे अर्जदारास तिचे व तिच्या मुलाचे भवितव्य अंधारमयच आहे, त्यामध्ये कुठल्याही प्रकारे बदल होणार नाही, याची खात्री झाली आहे आणि वि.प. हा दारूच्या व धुम्रपानाच्या अंमलाखाली सतत अर्जदार व तिच्या आईवडिलांशी भांडण काढून अर्जदाराला नांदवणेस नकार देत आला आहे व त्याने

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

अर्जदार आणि तिच्या मुलाला दुर्लक्षित केलेले आहे. त्यामुळे अर्जदाराला वि.प.बरोबर नांदणे हे अशक्य झाले आहे व अर्जदार आणि तिच्या मुलाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ही तिचा वि.प.शी तारीख ०९/०३/२०२१ रोजी झालेला विवाह हा रद्दबातल करणेसाठी अर्जदार हिने मे. दिवाणी न्यायाधीशसो वरिष्ठ स्तर, कोल्हापूर यांचे न्यायालयात हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३(१)(ia)(ib) प्रमाणे विवाह विच्छेदन होवून मिळणेसाठी एच.एम.पी.नं.३५/२०२५ चे काम दिनांक २१/०१/२०२५ रोजी दाखल केले आहे.

२७) सुरवातीला अर्जदार हिने वि.प. यांना त्यांच्या राहत्या पत्त्यावर अर्जाची नोटीस बजावणीसाठी न्यायालयामार्फत रजि.पोष्टाने समन्स, नोटीस पाठविली. ती वि.प. ने हेतुपुरस्सरपणे लागू करून घेतली नाही. काही तारखा झाल्यानंतर वि.प. यांना मे. कोर्टामार्फत नोटीस लागू झाली. त्यानंतरही त्यांनी म्हणणे दाखल करणेसाठी तारखा घेतल्या व दि.०२/०२/२०२६ रोजी त्यांनी अर्जदारांच्या अर्जास म्हणणे दाखल केले आहे. सदर दिले म्हणण्यामध्ये त्यांनी मे. सिव्हील जज्ज सिनीअर डिव्हीजन इचलकरंजी यांचे न्यायालयात एच.एम.पी.नं. 360 /२०२५ ची केस अर्जदाराने नांदणेस यावे म्हणून केलेबाबतचा उल्लेख केला आहे.

वास्तविक सदरची केस ही अर्जदार हिला केवळ नाहक त्रास देणेसाठी अभिलाष व दूष्ट प्रवृत्तीने केलेली आहे. अर्जदार हिने

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

मे. वरिष्ठ न्यायालय, कोल्हापूर येथे विवाह विच्छेदन होणेसाठी जी केस दाखल केली आहे, तिला शह देण्यासाठी आणि अर्जदाराला त्रास देवून केवळ अर्जदाराने दाखल केलेली केस मागे घेण्याच्या दूष्ट हेतुने दाखल केलेली आहे, हे संबंधीत वस्तुस्थितीवरून स्पष्ट होणारे आहे.

२८) अर्जदार ही महिला असून तिला लहान मूल आहे. इचलकरंजी येथील न्यायालयात जाणेस तिचे जिवीताला धोका आहे आणि अर्जदाराचा विवाह हा अशोका हॉल, गारगोटी येथे झालेला आहे व तिला वि.प.ने भांडण काढून घरातून बाहेर काढल्यानंतर ती रेखा चौगुले नगर, गारगोटी येथे तिच्या आईवडिलांकडे राहणेस आली आहे. अशा परिस्थितीत, मे. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, इचलकरंजी या न्यायालयातील एच.एम.पी.नं.........../२०२५ ही केस न्यायाचे कारणास्तव व योग्य न्यायदानासाठी मे. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, कोल्हापूर (मे. वामनसो) यांचे न्यायालयात वर्ग होणेसाठी अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल करणे भाग पडले आहे. त्यासी कारणे :—

(अ) अर्जदार हिचा विवाह अशोका हॉल, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथे दि.०९/०३/२०२१ रोजी झालेला आहे व वि.प. व त्यांच्या कुटूंबियांनी अर्जदाराला नाहक मानसिक व शारिरीक त्रास देवून भांडण काढून घराबाहेर काढलेले आहे व

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

त्यानंतर ती दि.२१/०५/२०२३ पासून तिचे माहेरी आईवडिलांकडे रेखा चौगुले नगर, गारगोटी येथे वास्तव्यास आली आहे.

(ब) वि.प. यांनी पश्चात बुध्दीने व अप्रामाणिक हेतुने अर्जदाराला जाणुनबुजून त्रास देणेसाठी व तिला नाहक कोर्ट कचेरीत गुंतवणेसाठी खोटया कारणांवर आधारून मे. दिवाणी न्यायाधीशसो वरिष्ठ स्तर, इचलकरंजी यांचे कोर्टात कथित नांदायला येणेबाबत खोटी व बनावट केस दाखल केलेली आहे, हे अर्जदार यांना वि.प. यांनी एच.एम.पी.नं.३५/२०२५ मधील दाखल केलेल्या विवाह विच्छेदन करणेचे कामी नि.१४ वर दिले दि.०२/०२/२०२६ च्या कैफियतीमध्ये नमूद केलेवरून समजलेले आहे.

(क) वास्तविक वि.प. याने ती केस अप्रामाणिक हेतुने व इचलकरंजी न्यायालयात अर्जदार हजर राहू शकणार नाही आणि त्याकारणे मे. कोर्टाचे एकतर्फा आदेश मिळवून अर्जदारवर अन्याय करणेसाठी केलेला प्रयत्न आहे, हे त्यांचेच वागणेवरून व वस्तुस्थितीवरून सुस्पष्ट होत आहे.

(ड) वि.प. यांनी मे. इचलकरंजी न्यायालयात दाखल केलेला कथित अर्ज हा मुळातच त्या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात व कार्यालयीन क्षेत्रात बसत नाही.

(इ) अर्जदार व तिच्या लहान मुलाला वि.प. व त्यांच्या आईवडिलांकडून जिवीतास धोका आहे.

Superintendent(Lit.)
District Court, Kolhapur

(ई) मा. उच्च न्यायालयाच्या व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सिध्द न्यायनिर्देशानुसारही ज्याठिकाणी विवाह झाला असेल आणि ज्याठिकाणी पत्नी राहत असेल त्याठिकाणच्या न्यायालयीन कार्यक्षेत्रात विवाह संबंधाचे खटले दाखल करणेचा व चालविणेचा अधिकार आहे. या ही कारणास्तव सदरचे प्रकरण मे. कोल्हापूर येथील वरिष्ठ न्यायालयात वर्ग होणे गरजेचे आहे.

(उ) वि.प. यांनी अर्जदार यांना त्रास देणेसाठी व अर्जदार यांनी मे. कोल्हापूर न्यायालयात विवाह विच्छेदनाची केस दाखल केल्यानंतर पश्चात बुध्दीने इचलकरंजी न्यायालयात कथित केस दाखल केली आहे.

(ऊ) सध्या अर्जदार यांनी दाखल केलेली एच.एम.पी. नं.३५/२०२५ ची केस ही चौकशीकरिता प्रलंबित आहे आणि वि.प. यांच्या कथित इचलकरंजी न्यायालयातील केसची नोटीस अद्याप अर्जदाराला लागू झालेली नाही.

(ए) उभय न्यायालयातील प्रकरणांचा योग्य न्यायनिर्णय होणेसाठी व परस्पर विसंगत आदेश टाळणेसाठी (to avoid contradictory orders) सुध्दा प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणे न्यायोचित व गरजेचे आहे.

(ऐ) अर्जदार यांनी दाखल केलेल्या एच.एम.पी. नं.३५/२०२५ चे प्रकरणात वि.प. हे हजर झालेले आहेत व त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. अशा परिस्थितीत जर इचलकरंजी न्यायालयातील पिटीशन मे. दिवाणी न्यायाधीशसो

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

वरिष्ठ स्तर, कोल्हापूर यांचे न्यायालयात वर्ग झालेस वि.प. यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही व त्यांनाही दोन्ही खटले एकाचवेळी मे. कोल्हापूर न्यायालयात चालविणे सोयीचे होणार आहे.

याउलट जर इचलकरंजी येथील प्रकरण मे. कोल्हापूर येथील न्यायालयात वर्ग न झाल्यास अर्जदार यांचे अपरिमित नुकसान होणार आहे व त्यांना नाहक त्रास होणार आहे.

(ओ) अर्जदार व तिच्या मुलाच्या शारिरीक व मानसिक सुरक्षिततेच्या कारणासाठीही प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणे न्यायोचित व गरजेचे आहे.

(औ) अन्य कायदेशीर कारणास्तवही अर्जदार यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे.

२९) **<u>अर्जास कारण :—</u>** अर्जदार हिने मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कोल्हापूर यांचे कोर्टात विवाह विच्छेदनासाठी एच.एम.पी. नं.३५/२०२५ चे प्रकरण दि.२१/०१/२०२५ रोजी दाखल केल्यानंतर वि.प. याने या अर्जास दि.०२/०२/२०२६ रोजी म्हणणे दाखल केले व त्यामध्ये त्याने इचलकरंजी येथील वरिष्ठ न्यायालयात एच.एम.पी. नं.360../२०२५ चे प्रकरण दाखल केलेवरून अर्जदारास समजून आले. त्यावेळी व तद्नंतर वेळोवेळी अर्जास कारण घडलेले आहे व घडत आलेले आहे.

Superintendent(Lit.)
District Court, Kolhapur

३०) अर्जास योग्य तो कोर्ट फी जोडलेला आहे.

३१) अर्जास कारण पाहता अर्जदार यांचा अर्ज मुदतीत आहे.

३२) अर्जदार हिचा विवाह अशोका हॉल, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथे झालेला आहे आणि सध्या अर्जदार ही तिच्या आईवडिलांकडे रेखा चौगुले नगर, गारगोटी, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथे राहणेस आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात चालणेस पात्र आहे.

३३) एच.एम.पी. नं.३५/२०२५ चे दाखल अर्जाखेरीज अर्जदार यांनी यासंदर्भात इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज दाखल केलेला नाही अगर तो प्रलंबित नाही.

३४) अर्जदार व वि.प. पैकी कोणीही विकलांग नाही.

३५) <u>सबब, अर्जदार मे. कोर्टाना नम्र विनंती की,</u>

अ. अर्जदार यांचा प्रस्ततुचा अर्ज खर्चासह मंजूर करणेत यावा व या अर्जाचा कोर्ट खर्च वि.प. कडून अर्जदारांना वसूल होवून मिळावा.

Superintendent(Lit.)
District Court, Kolhapur